# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 11/03/2021 (गुरूवार)

(सकाळ)

---

### दुखापत

पो.स्टे. पारशिवनी :– अंतर्गत 04 कि.मी अंतरावर मौजा करंभाड येथे दिनांक 10/03/2021 चे 19.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– मधु उर्फ प्रविण सुरेश मेंघर, वय 30 वर्ष, रा. वार्ड क्र. 2 करंभाड व आरोपी क्र. 1) लाला गिरी रा. करंभाड हे दोघेही एकामेकाचे घरा शेजारी राहणारे आहेत. फिर्यादी व त्याचा मोठा भाउ योगेश सुरेश मेंघर हे आपले घरी हजर असतांना जुन्या भांडणाच्या कारणावरून आरोपी क्र. 1) लाला गिरी हा त्याचे घरी आला व फिर्यादीची वहीनी हिला शिवीगाळ करून ढकलढुकल करू लागला. याबाबत फिर्यादीला व त्याच्या भावाला सहन झाले नाही म्हणुन फिर्यादी व त्याचा भाउ यांनी आरोपीचे घरी गेले तेव्हा आरोपी क्र. 1 व 2) जिजा पुरी दोन्ही रा. करंभाड यांनी फिर्यादी व त्याच्या भावाला विट फेकुन व लाकडी काठीने मारहाण करून जखमी केले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम 324, 336, 504, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवा श्री. संजय शिंदे 9822932253 हे करीत आहे.

### अपघातात मृत्यु

पो.स्टे. एमआयडीसी बोरी :– अंतर्गत 2 कि.मी. स्टार सरक्लिप कंपनी एमअरयडीसी बोरी येथे दिनांक 10/03/2021 चे 17:00 वा. ते 17.10 वा. दरम्यान आरोपी नामे– साहेबराव चंद्रभवन सालवनकर, वय 40 वर्ष, रा. सातनवारी जि. नागपूर हा दारू पिवुन स्वताच्या ताब्यातील एमएच– 40/बीएस– 5356 क्रमांकाचा मोटरसायकलने भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन गाडी स्लिप होवुन डिवायडरला आदळल्याने डोक्यावर गंभीर जखमी होवुन मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– प्रफुल दादाराव ढेंगरे, वय 30 वर्ष, रा. भारकस ता. हिंगणा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा 9923049472 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर